# लोकशाहीर संभू राजू भिलवडीकर

गणेश गोपाळ जोशी

सांगली जिल्ह्यात कृष्णेच्या तीरावर भिलवडी हे गाव आहे. जवळच श्री क्षेत्र औदुंबर हे दत्तात्रयांचे पवित्र स्थान आहे. अशा पवित्र ठिकाणी संभाजी अण्णा यांचा जन्म एका गरीब कोष्टी घराण्यात शके १८०६ साली झाला. अत्यंत गरिबी, धंदा–मागावर कापड विणण्याचा त्यांच्या वडिलांचे नाव कोनाप्पा व आईचे नाव सत्यव्वा असे होते. त्यांना दोन भावंडे होती. त्यांची नांवे शिवा व बाबाजी. त्या काळात शिक्षणाकडे सामान्य लोकांचा विशेष कल नसायचा. तरीही भिलवडीच्या प्राथमिक शाळेत संभाजी अण्णांचे इ. चवथीपर्यंतचे शिक्षण झाले असावे. त्यांच्या घरी पूर्वीपासूनच दैवी उपासना होती; कारण त्यांचे वडील प्रख्यात मांत्रिक होते. ती विद्या त्यांनी संभाजी अण्णांना दिली होती. लहानपणापासून अण्णांचा ओढा भक्तिमार्गाकडे होता. रोज कृष्णामाईंचे स्नान–नित्य दत्त दर्शन असा अण्णांचा नित्यक्रम चालू होता. सवंगडी जमा करणे, निरनिराळे खेळ करणे, वाद्ये वाजवणे असा छंद. त्यामुळे अण्णांची प्रकृती सुदृढ होती. पुढे त्यांनी मंत्रविद्या आत्मसात केली व त्यामुळे त्यांचे नांव 'मांत्रिक' असे पडले.
भिलवडीपासून चौदा मैलावर मणेराजुरी नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी रामा–नरु नावाचे एक गृहस्थ लोकसंगीतातील भेदिक हा प्रकार गात होते. काव्ये तयार करीत होते. त्यांची व अण्णांची भेट झाली व अण्णांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले व येथूनच भेदिक नावारूपास येऊ लागले. जवळजवळ बारा वर्षे अण्णांनी रामा नरूची सेवा केली. निरनिराळ्या ग्रंथांचा अभ्यास केला व त्यांनी काव्यरचनेस सुरुवात केली. भेदिक यासच कलगी तुरा असे म्हणतात.

पेशवाईत राम जोशी, छगनभाऊ, पठ्ठे बापूराव, होनाजी बाळा असे नामवंत शाहीर होऊन गेले. त्यानंतर गेल्या शतकात हा कलगी तुरा संभूराजू व हैबतीबाबा यांनी जोपासला. संभूराजू हे तुरेवाले म्हणजे शिवश्रेष्ठ मानणारे व हैबती बाबा हे कलगीवाले म्हणजे शक्ती श्रेष्ठ मानणारे. या दोघांनी अनेक विषयावर काव्ये तयार केली आहेत. अनेक ठिकाणी त्यांचे सामने झाले आहेत. अनेक विषयांवर त्यांची काव्ये उपलब्ध आहेत. त्यात भक्तिमार्ग, ज्ञानसाधना, गुरुभक्ती, समाधिमार्ग, छंदिका अशा अनेक विषयांवर त्यांचे काव्य उपलब्ध आहे. हे लोकवाङ्मय सर्व खेड्यापाड्यांतून विखुरलेले आहे. पूर्वी भेदिकास राजाश्रय होता, त्यामुळे त्यांची जोपासना होऊ शकली. पण जसा याचा राजाश्रय नष्ट झाला, तसा हा प्रकार मागे पडू लागला. लोकांचे लक्ष भाव–गीतांकडे लागून राहिले. भेदिकातील आशय अध्यात्मिक असल्याने कित्येकांना त्याचा अर्थ लागेना.

संभाजी अण्णा यांची निरनिराळ्या विषयांवर सुमारे एक लाख काव्ये आहेत. पण ती संघटित वा एकत्रित नाहीत. सर्व महाराष्ट्रभर ती विखुरलेली आहेत. संभाजी–अण्णा यांचा समाधिमार्ग हा काव्यभाग अत्युच्च दर्जाचा आहे. त्यांच्या प्रत्येक काव्याच्या शेवटी संभू–राजू म्हणे असे आहे त्यांचा एक शिष्य राजू तांबोळी हा होता. हा राजू तांबोळी सदैव अण्णांबरोबर असायचा. तो भेदिक गात नव्हता. पण शिष्यावरच्या प्रेमापोटी आण्णांनी आपल्या नावाबरोबर त्याचे नाव जोडून त्याला अमर केले आहे. अण्णांनी अनेक शिष्य तयार केले होते, त्यापैकी अंकलखोप येथील कृष्णा गुणी व भाऊ बाबाजी, लेंगरे (विटा) येथील नाथा माने हे प्रमुख शिष्य. तसेच प्रसिद्ध तमासगीर तात्या सावळजकर व शिवा–संभा कवलापूरकर यांनाही अण्णांनी मार्गदर्शन केले होते. अशा या लोकशाहीराने भिलवडी येथे शके १८७६ वैशाख शुद्ध नवमी, रविवार या दिवशी देह ठेवला. त्यांची समाधी आज भिलवडी, ता. तासगाव, जि. सांगली येथे आहे. प्रत्येक वर्षी त्यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम समाधीजवळ साजरा केला जातो.